महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२.
रजि.ऑफीस -"आदिवासी विकास भवन",२ रा मजला,राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२.दुरध्वनी- (०२५३) २५७१७८२,२५७६८६०, फॅक्स- (०२५३) २५७१५६०.
mail- msctdcnsk@gmail.com

**दिनांक २८.०९.२०१८ रोजी सभा कक्ष, रवि भवन, नागपुर येथे संध्याकाळी ०७:०० वाजता मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक आणि मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त**

**सभेस खालील प्रमाणे सन्माननीय संचालक सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्माननिय संचालक सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.श्री.विष्णुजी सवरा,<br>मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.राजे अंब्रीजराव अत्राम,<br>मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | उपाध्यक्ष |
| ३. | मा.ॲड.श्री.देविदास पांडुरंग पाटील | संचालक |
| ४. | मा.श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा | संचालक |
| ५. | मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले | संचालक |
| ६. | मा.श्री.विकास दुलाजी वळवी | संचालक |
| ७. | मा.श्री.मधुकर निबांजी काठे | संचालक |
| ८. | मा.श्री.विठ्ठल देवराम देशमुख | संचालक |
| ९. | मा.श्री.केवलराम तुळशीराम काळे | संचालक |
| १०. | मा.श्री.मगन नुरा वळवी | संचालक |
| ११. | मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम | संचालक |
| १२. | मा.श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग | संचालक |
| १३. | मा.श्री.प्रकाश तुळशीराम दडमल | संचालक |
| १४. | मा.श्रीमती जयश्री नामदेव तळपे | संचालिका |
| १५. | मा.श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी | संचालिका |
| १६. | मा.अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांचे प्रतिनिधी श्री.चव्हाण | संचालक |
| १७. | मा.श्री.वसंत पाटील, मा.सहनिबंधक, सहकारी संस्था, आदिवासी विकास, नाशिक | संचालक |
| १८. | मा.श्री.दिलीप गावडे, व्यवस्थापकीय संचालक,<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक | सदस्य सचिव |

Scanned with CamScanner

मा.श्री.आदिनाथ दगडे, महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी मान्यवरांचे स्वागत करुन सभेचे मा.अध्यक्ष यांचे परवानगीने मा.संचालक मंडळ सभेस सुरुवात करणेस सांगितले.

मा.संचालक श्री.दुधनाग सो यांनी मा.अध्यक्ष, आदिवासी विकास विभाग यांचे आभार मानुन सभेची कार्यवाही करणेस सुचित केले. मा.अध्यक्ष, आदिवासी विकास यांनी उपस्थित सदस्य यांची गणपुर्ती झाल्याने मा.व्यवस्थापकीय संचालक यांना विषयसुचीप्रमाणे सभेचे कामकाज सुरु करण्यात अनुमती दिली.

सर्व संचालकांनी संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ रोजीचे केलेल्या कार्यवाहीबाबत मागणी केली. परंतु महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी विश्लेषन करतांन नमुद केले की, संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ रोजी सभेच्या इतिवृत्तातील बऱ्याच ठरावांवर कार्यवाही ही पुर्ण झालेली असुन सभेच्या इतिवृत्तास अद्यापपर्यंत मान्यता मिळालेली नसल्या कारणाने केलेली कार्यवाही ही सादर करण्यात आलेली नाही.

श्री.आदिनाथ दगडे, महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी प्रस्तावना करुन सभेचे विषयसुचीप्रमाणे कामकाजास सुरुवांत करण्यात आली.

**विषय क्रमांक १ : संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ चे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ रोजीचे इतिवृत्त हे संचालक मंडळ सभेस वाचुन दाखविले. मा.संचालक सदस्यांनी इतिवृत्त वाचुन दाखवितांना अशी सुचना केली की, संचालक मंडळ सभेत झालेली चर्चा ही जशीस तशी ही इतिवृत्तात घ्यावी. या सुचनेनंतर संचालक मंडळ सभेने संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ रोजीच्या ठरावास मान्यता दिली आणि खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक १ :** संचालक मंडळ सभा दिनांक १४.०९.२०१८ रोजीचे इतिवृत्तास सदरची संचालक मंडळ सभा हि मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :** मा.श्री.केवलराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य
**ठराव बहुमताने मंजुर**

**विषय क्रमांक २ : बोनस व सानुग्रह मंजुर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासाठी बोनस अधिनियम १९६५ लागु असल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना बोनस प्रदान अधिनियम १९६५ च्या नुसार ८.३३% इतका बोनस देणे क्रमप्राप्त आहे. शासनाने आदिवासी विकास विभागाने पत्र क्रमांक संकिर्ण-१०८७/प्र.क्र.५७/का.३, दिनांक ११.०२.१९८८ अन्वये तसे महामंडळास कळविले असुन, त्यानुसार ८.३३% दराने कर्मचाऱ्यांना बोनस देण्यास शासनाने आदेश दिले आहेत. तसेच शासनाने वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक शायाक्र-१०९८/प्र.क्र.२७/९८/सा.दु., दिनांक ०३.१०.१९९८ नुसार शासनाने बोनस अधिनियम १९६५

Scanned with CamScanner

लागु असलेल्या उपक्रमांनी कायद्यानुसार बोनस अदा करणेस कळविले असुन, त्यासाठी शासनाच्या पुर्वसंमितीची आवश्यकता असणार नाही असहेही कळविले आहे. त्यानुसार बोनस ॲक्टप्रमाणे ८.३३% बोनस तसेच नफयाच्या २५% सानुग्रह अनुदान मंजुर करावे, अशी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कर्मचारी संघटना, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्रमांक ७५ दिनांक ०७.०९.२०१८ नुसार विनंती केली आहे.

कर्मचारी संघटनेने त्याचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे महामंडळास बोनस प्रदान अधिनियम १९६५ हा महामंडळास लागु आहे. तसेच शासनाचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे ८.३३% प्रमाणे बोनस अदा करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार बोनस अधिनियमातील तरतुदीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना रुपये ३५००.०० बोनस मागील वर्षी अदा केला आहे. त्यानुसार सन २०१८-१९ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे बोनस अदा करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

बोनस व्यक्तरिक्त कर्मचारी संघटनेने वर नमुद केलेप्रमाणे सानुग्रह अनुदान मिळण्याची विनंती केली आहे. सन २०१८-१९ या वर्षात महामंडळास रक्कम रुपये ३.५१ कोटी इतका नफा झाला आहे. सन २०१७-१८ मध्ये महामंडळाने अधिकारी/कर्मचारी यांना नफयाच्या २०% इतकी रक्कम सम प्रमाणात सम प्रमाणात सानुग्रह अनुदान अदा केले होते. महामंडळाला नफा मिळवुन देण्यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांचे प्रयत्नांचाही वाटा असल्याने तसेच सन २०१८-१९ या वर्षासाठी कर्मचारी संघटनेने बोनस व्यक्तरिक्त २५% इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी मागणी केली आहे.

तरी महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी यांना नियमानुसार बोनस आणि कर्मचारी संघटनेने त्यांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे, त्यांना दुर्गम भागात काम करावे लागत असलेले कामकाज, तसेच तेथे मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय नसल्याने दोन ठिकाणी कुटुंब ठेवावे लागत असल्याने होणारी आर्थिक कुचंबना याबाबींचा सहानुभुतीपूर्वक विचार करतां, सन २०१८-२०१९ या वर्षासाठी त्यांना द्यावयाचे बोनस व सानुग्रह अनुदान मंजुर करणेसाठी हा विषय संचालक मंडळाचे मंजुरीसाठी सादर केला आहे, तरी त्यास मंजुरी मिळावी.

उपरोक्त विषयाबाबत सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर संचालक मंडळातील काही संचालक सदस्य यांनी रोजंदारी कर्मचारी यांना बोनस आणि सानुग्रह अनुदान दिले जाते काय? याबाबत विचारणा केली. याबाबत महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी शासकीय निर्णयानुसार खुलाश्यात स्पष्ट केले की,

- नैमित्तीक वेतनावरील (रोजंदारीवरील) कर्मचाऱ्यांना कर्मचारी सानुग्रह अनुदान अनुज्ञेय असणार नाही.
- तीन वर्ष किंवा जास्त कालावधीमध्ये प्रत्येक वर्षी किमान २४० दिवस काम केलेले नैमित्तीक कर्मचारी बोनससाठी पात्र ठरतील.

Scanned with CamScanner

उपरोक्त चर्चेअंती सर्वच संचालक सदस्यांनी चर्चेत भाग घेवुन सांगितले की, गतवर्षाप्रमाणे बोनस प्रदान अधिनियम १९६५ नुसार ८.३३% किमान रुपये ३५००.०० व सानुग्रह अनुदान झालेल्या नफयाच्या २०% मंजुर करण्यात हरकत नसावी.

वरील प्रमाणे चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक २ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, गत वर्षाप्रमाणे बानेस प्रदान अधिनिमय-१९६५ च्या कलम १० नुसार ८.३३% किमान रुपये ३५००.०० व झालेल्या नफयाच्या २०% सानुग्रह अनुदान मंजुरीबाबत अनुमती देत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सुचक :** मा.श्री.विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.मधुकर निबांजी काठे, संचालक सदस्य

**ठराव बहुमताने मंजुर**

**विषय क्रमांक ३: आदिवासी विकास महामंडळाचे अस्थापनेवरील नियमित सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागु करणेबाबत.**

केंद्र शासनाने दिनांक ०१.०१.२०१६ पासुन केंद्रीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागु केला आहे. त्याअनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करणेसंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचे आस्थापनेवरील नियमित सेवेत कार्यरत असणारे अधिकारी यांना सातवा वेतन आयोग लागु करणेबाबत मा.संचालक आणि कर्मचारी संघटना, नाशिक यांनी कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचे आस्थापनेवरील कर्मचायांना सातवा वेतन लागु करणेसंदर्भात आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन वेळोवेळी पत्रव्यवहार करुन या कार्यालयाकडील याबाबतची माहिती मागविलेली असुन सदरची माहिती शासन पत्रांमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने शासनास सादर केलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यासंदर्भात प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत मा.संचालक मंडळाचे मान्यतेस विषय हा महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सादर केला.

उपरोक्त विषयावर मा.संचालक सदस्य यांनी पाचवा वेतन आयोग लागु केल्यानंतर नियमित कर्मचाऱ्यांच्या जो फरक बाकी आहे, याबाबत विचारणा केली. यावर

Scanned with CamScanner

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी पाचवा वेतन आयोगाचा नियमित कर्मचाऱ्यांच्या फरकाबात शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, असे नमुद केले.

याबाबत सर्व संचालकांनी मा.अध्यक्ष, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ तथा मा.मंत्री (आदिवासी विकास) आणि मा.उपाध्यक्ष, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ तथा मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांना सदर फरक मिळणेबाबत तसेच सातवा वेतन आयोग लागु होणेस शासन स्तरावरुन पाठपुरावा करणेबाबत विनंती केली.

मा.संचालक सदस्य यांच्या चर्चे अंती खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, पाचवा वेतन आयोगातील फरक हासुध्दा कर्मचाऱ्यांना देण्यासाठी शासनास पुनश्च प्रस्ताव पाठवुन पाठपुरावा करावा. तसेच सातवा वेतन महामंडळातील कर्मचाऱ्यांना लागु करणेस शासनास प्रस्ताव पाठविणेस सदर सभा मंजुर देत आहे. यापुढील कार्यवाही करणेचे अधिकार सदर सभा व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक :** मा.श्री.देविदास पांडुरंग पाटील, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ४ :- सेवानिवृत्त अधिकारी / कमर्चारी यांचे विभागीय चौकशी, घट-तुट व न्यायालयीन प्रकरणी प्रलंबित असलेल्या उपदान, रजारोखिकरण व इतर आर्थिक लाभांची अदायगी करणेबाबत.**

आदिवासी विकास महामंडळाचे आस्थापनेवर नियमित सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर सेवेत असताना व सेवानिवृत्तीनंतर त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही (महामंडळ व शासन स्तर) सुरु असल्यामुळे तसेच गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील कर्मचाऱ्यांची धानाबाबतची घट-तुट निश्चिती बाबत आदेश पारित न केल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांकडुन एकुण किती रक्कमेचा अपहार झालेला आहे याबाबत नियमानुसार वसुलीची कार्यवाही न केल्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारे उपदान व रजा रोखिकरण तसेच इतर आर्थिक लाभांची अदायगी झालेली नाही.

आदिवासी विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या एकाधिकार खरेदी योजना व आधारभुत किंमत खरेदी योजनामध्ये खरेदी करण्यात येणाऱ्या धानाची मोजणी वेळेत न झाल्यामुळे गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांबाबत घट-तुट निश्चित होवु शकली नाही. हंगाम संपल्याबरोबर धानाची उचल न झाल्यामुळे तसेच धानाची मोजमाप उशिराने झाल्याने अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ विलंबाने प्रदान केले जात आहेत.

Scanned with CamScanner

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नाही. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास ३० दिवसाचे कालावधीत उपदानाची रक्कम अदायगी करणेबाबत तरतुद असुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्याने कार्यालयाचे आर्थिक नुकसान व अफरातफर केलेली असल्यास अशी रक्कम उपदानातुन राखुन ठेवता येते मात्र सेवानिवृत्त कर्मचारी यांचे उपदान रोखुन ठेवावयाच्या रक्कमेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडुन संबंधित कर्मचारी व नियंत्रक प्राधिकारी अतिरीक्त आयुक्त लेबर यांना याबाबत लेखी स्वरुपात कळवावे लागते.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदींनुसार उपदान राखुन ठेवणेबाबत शासनास अधिकार आहेत. परंतु महामंडळास सदरचे सेवानियम लागु नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक लाभांची अदायगी करणेकरीता अडचणी निर्माण होत असतात.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडुन मा.न्यायालयामध्ये दावे दाखल केले जातात त्यामुळे अशा प्रकरणी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ मधील तरतुंदीनुसार कार्यवाही न केल्यामुळे सदरचे दाव्यांचा निर्णय मा. न्यायालयाकडुन संबंधित कर्मचाऱ्याचे बाजुने दिला जात असल्याने व मा. न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याने परिणामी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असुन संबंधित कर्मचाऱ्यांना व्याजाची आकारणी नुसार रक्कम अदा करावी लागते.

तसेच कर्मचाऱ्यांकडुन महामंडळाची येणे- देणे रक्कम असल्यास अशी रक्कम निश्चित करुन वसुली बाबत दिवाणी दावा दाखल करावा लागेल.

मागील वर्षापर्यंतच्या एकाधिकार खरेदी योजना व आधारभुत किंमत खरेदी योजनामध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाची मोजणी करण्यात आलेली असुन गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील घट-तुट निश्चित करणेची कार्यवाही सुरु आहे.

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नसल्याने या कार्यालयाचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित उपदान प्रकरणांबाबतचा सविस्तर तपशिल सोबत सादर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान अदायगी करणेकरीता महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी विषय संचालक मंडळ सभेपुढे सादर केला. सदर विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

Scanned with CamScanner

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नाही. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास ३० दिवसाचे कालावधीत उपदानाची रक्कम अदायगी करणेबाबत तरतुद असुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्याने कार्यालयाचे आर्थिक नुकसान व अफरातफर केलेली असल्यास अशी रक्कम उपदानातुन राखुन ठेवता येते मात्र सेवानिवृत्त कर्मचारी यांचे उपदान रोखुन ठेवावयाच्या रक्कमेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडुन संबंधित कर्मचारी व नियंत्रक प्राधिकारी अतिरीक्त आयुक्त लेबर यांना याबाबत लेखी स्वरुपात कळवावे लागते.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदींनुसार उपदान राखुन ठेवणेबाबत शासनास अधिकार आहेत. परंतु महामंडळास सदरचे सेवानियम लागु नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक लाभांची अदायगी करणेकरीता अडचणी निर्माण होत असतात.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडुन मा.न्यायालयामध्ये दावे दाखल केले जातात त्यामुळे अशा प्रकरणी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ मधील तरतुंदीनुसार कार्यवाही न केल्यामुळे सदरचे दाव्यांचा निर्णय मा. न्यायालयाकडुन संबंधित कर्मचाऱ्याचे बाजुने दिला जात असल्याने व मा. न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याने परिणामी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असुन संबंधित कर्मचाऱ्यांना व्याजाची आकारणी नुसार रक्कम अदा करावी लागते.

तसेच कर्मचाऱ्यांकडुन महामंडळाची येणे- देणे रक्कम असल्यास अशी रक्कम निश्चित करुन वसुली बाबत दिवाणी दावा दाखल करावा लागेल.

मागील वर्षापर्यंतच्या एकाधिकार खरेदी योजना व आधारभुत किंमत खरेदी योजनामध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाची मोजणी करण्यात आलेली असुन गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील घट-तुट निश्चित करणेची कार्यवाही सुरु आहे.

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नसल्याने या कार्यालयाचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित उपदान प्रकरणांबाबतचा सविस्तर तपशिल सोबत सादर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान अदायगी करणेकरीता महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी विषय संचालक मंडळ सभेपुढे सादर केला. सदर विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा / प्रलंबाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.यु.एस.तोडसाम | प्रतवारीकार | जव्हार | राजीनामा २०.१२.२००८ | • श्री. तोडसाम यांचेवर घट-तुट बाबत एकुण येणे-देणे रक्कम रुपये-२,९२,६००/- इतकी आहे. तर एकुण उपदान रक्कम रुपये-२,३५,२४०/-आहे त्यामुळे वसुल पात्र एकुण रक्कम रुपये-५७,३६०/-याबाबतच्या वसुलीची कार्यवाही झालेली नाही.<br>• प्रस्तुत प्रकरणी प्रा.व्य., जव्हार यांचेकडुन अहवाल मागविण्यात आलेला आहे. |
| २ | श्री.सी.एस.जगताप | व्यवस्थापक | मु.का. नाशिक | २८.०२.२०११ | • श्री. जगताप हे शबरी आदिवासी विकास महामंडळामध्ये कार्यरत असतांना गैरव्यवहार/अनियमितता केलेली असल्याने याबाबत विभागीय चौकशी अहवालाचे निष्कर्षानुसार एकुण रक्कम रुपये-१,०४,२९,००३ वसुलीबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.<br>• सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. दि.१०.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये मा.संचालक मंडळ सभेमध्ये अपिल करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| ३ | श्री.एम.एस. महाजन | लेखापाल | जव्हार | ३१.०७.२०११ | • महामंडळाचे अपहार केलेल्या रक्कम रु-७,५३,१६० चे वसुलीबाबत नोटीस दि.३१.०१.२०१८ रोजी बजावण्यात आलेली असुन सदर नोटीसचा खुलासा प्राप्त झालेला असुन श्री. महाजन यांनी रक्कम वसुली अमान्य असल्याचे कळविलेले असुन याबाबत विधीतज्ञ यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. |
| ४ | श्री.जे.ए.नैताम | प्रतवारीकार | अहेरी | ३१.१२.२०१२ | • दि.२६.०९.२०१६ चे या कार्यालयाकडील पत्रान्वये विभागीय चौकशी व त्यांचेकडे असलेल्या वसुलीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेकरीता उपप्राका, अहेरी यांना कळविण्यात आलेले असुन प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे. |
| ५ | श्री.बी.एम.दाणी | उपप्रादे व्यव | भंडारा | ३०.०६.२०१४ | • नेरीयन राईस मिल, नेरी हंगाम २०१३-१४ मध्ये बँक गॅरंटी न घेता दिलेल्या धानाच्या वसुली संदर्भात विभागीय चौकशी पुर्ण झालेली असुन श्री. दाणी यांना खुलासा सादर करणेकरीता अंतिम नोटीस दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी FIR दाखल करण्यात आलेले आहे. |

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | श्री.एस.यु.सलाम | प्रतवारीकार | गडचिरोली | ३१.०७.२०१४ | • घट-तुट निश्चित न केल्याने प्रा.व्य.गडचिरोली यांनी उपदान व रजा प्रस्ताव सादर केलेला नाही. |
| ७ | श्री.एम.टी.सिडाम | उपप्रादे व्यव | अहेरी | ३०.०६.२०१५ | • बनावट बँक गॅरंटी प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण झालेली असुन श्री. सिडाम यांना खुलासा सादर करणेकरीता अंतिम नोटीस दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी FIR दाखल करण्यात आलेले आहे. |
| ८ | श्री.बी.टी.पवार | उपप्रादे व्यव | जव्हार | ३१.१०.२०१५ | • राजेश राईस मिल, किन्हवली यांचे बाबत २०१३-१४ मधील भरडाईबाबत तांदुळ जमा न करणेबाबत व कारवार गोदाम वेळेवर न सोडण्याबाबत विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात आलेली असुन चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार श्री.पवार यांना अंतिम खुलासा सादर करणेकरीता नोटीस बजावण्यात आलेली आहे तसेच त्यांचा खुलासा प्राप्त झालेला असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात आहे. |
| ९ | सौ.टी.आर.दुबळा | टंकलिपीका | जव्हार | ३१.१०.२०१५ | • श्रीमती.दुबळा ह्या एकुण ५६१ दिवस गैरहजर असुन वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र दि.१.०८.२०१७ रोजी एकुण ६ महिन्यांचे कालावधीनंतर सादर केलेले आहे.<br>• महामंडळाचे कर्मचारी सेवानियम क्रं.४६ नुसार कर्मचारी विनापरवानगी १० दिवसांपेक्षा अधिक दिवस गैरहजर असल्यास बडतर्फ करणेची तरतुद असल्याने याबाबत दि.०१.०३.२०१८ चे या कार्यालयाकडील पत्रान्वये प्रा.व्य.जव्हार यांचेकडुन खुलासा मागविण्यात आलेला असुन खुलासा अद्याप अप्राप्त आहे. |
| १० | श्रीमती. ए. आर. राजगोंड | शिपाई | जुन्नर | राजीनामा ३१.१२.२०१५ | • श्रीमती. राजगोंड यांच्या एकुण २७२८ दिवस बिनपगारी रजा मंजुरीकरीता प्रा.व्य.जुन्नर यांचे दिनांक २८.०३.२०१८ रोजी प्रस्ताव सादर केलेला असुन त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| ११ | श्री. एम. एच. चौबिसा | गोदामपाल | धारणी | ३१.०३.२०१६ | • खरेदी केंद्र चाकर्दा प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असुन चौकशी अद्याप पुर्ण झालेली नाही. |
| १२ | श्री.एच.डी.उईके | प्रतवारीका | गडचिरोली | ३०.०६.२०१६ | • प्रा.व्य.गडचिरोली यांचेकडुन उपदान व रजा रोखिकरण प्रस्ताव अप्राप्त आहे. |
| १३ | श्री.सी.एन.शिंपी | व.सहा | गडचिरोली | ३१.०८.२०१६ | • दि.२१.०८.२०१७ चे विभागीय कार्यालयाकडील प्रस्तावानुसार वैद्यकीय मंडळ, नागपुर यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्राचे अनुषंगाने दि.०४.०५.२०१८ चे आदेशान्वये रजा मंजुर करण्यात आलेली आहे. प्रा.का. गडचिरोली यांचेकडुन उपदान व रजा रोखिकरण |

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | अदायगीचा प्रस्ताव अप्राप्त आहे. |
| १४ | श्री.एन.एस.मांदळे | महाव्यव | नाशिक | ३१.१२.२०१६ | • नियमबाह्य अनुकंपा प्रकरणी शासनाकडुन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन अद्याप चौकशी पुर्ण झालेली नाही. तसेच शासनास उपदान अदायगी करणेबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| १५ | श्री.ए.ए.आगळे | संस्था व्यव | जव्हार | ३१.१२.२०१६ | • नेरीयन गोदाम, नेरी ता. मोहाडी येथे साठवणुक केलेला एकुण १२,२४५ क्विंटल धान साठा अफरातफर प्रकरणी विभागीय चौकशीची सुरु केलेली असुन चौकशी पुर्ण झालेली आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार अंतिम नोटीस बजावण्यात आलेली आहे. |
| १६ | श्री.पी.आर.निकम | व.सहा | जव्हार | ३१.०७.२०१७ | • प्रा.व्य.जव्हार यांना या कार्यालयाकडील दि.२४.०८.२०१८ चे पत्रान्वये खुलासा मागविण्यात आलेला असुन सदरचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे. |
| १७ | श्री.बी.डी.पाटील | प्रतवारीकार | जव्हार | ३०.०९.२०१७ | • उपप्राका, शहापुर येथे कार्यरत असतांना सन २०१०-११ ते २०१६-१७ मध्ये आधारभुत योजनेअंतर्गत लाखो रुपयांची घट आणणे, मालाचा गैरव्यवहार करणे, डि ओ. नुसार पार्टीस माल न देणे इत्यादी प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. |

Scanned with CamScanner

ठराव क्रमांक ४ : सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, सदर विषयाबाबत प्रकरण निहाय वस्तुस्थितीबाबतची सविस्तर माहिती ही आगामी संचालक मंडळ सभेत ठेवण्यात यावा.

**सुचक :** मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.देविदास पांडुरंग पाटील, संचालक सदस्य
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ५ :- आदिवासी विकास महामंडळाचे आस्थापनेवरील पदे निविदा प्रक्रिया राबवुन बाह्ययंत्रणेव्दारे भरणेकरीता मंजुरीबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचे आस्थापनेवरील टंकलिपीक संवर्गाची ८ पदे व क्लिनर या संवर्गाची ७ पदे ही बाहययंत्रणेकडून सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मंबई. शासन निर्णय आस्था-२०११/ प्र.क्र.१५९/का-१५ दिनांकः-०४ ऑक्टोबर,२०१३ नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे.

सद्यस्थितीत महामंडळाचे आस्थापनेवर मंजुर आकृतीबंधातील एकुण १२९८ पदांपैकी ४४८ पदे कार्यरत आहेत. मुख्य कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालयांकडुन अपुरे कर्मचारी संख्या असल्यामुळे कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केली जात आहे.

महामंडळाचे योजना राबविणेकरीता NEML द्वारे ऑनलाईन आज्ञावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच महामंडळामार्फत खरेदी करण्यात आलेला कृषीउपज व गौणउपज मालाची विक्री देखील इंडिट्रेड व एनसीडीएक्स यांचेमार्फत केली जात असल्याने सदरच्या आज्ञावली हाताळण्याकरीता कॉम्प्युटर ऑपरेटर यांची आवश्यकता आहे.

मंजुर आकृतीबंधानुसार खालील संवर्गातील पदांचे तपशिलाप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवुन बाहययंत्रणेकडून सेवा उपलब्ध करुन देणेबाबत सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | कार्यरत पदे | बाहययंत्रणेकडून सेवा उपलब्ध करुन घ्यावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १. | लघुटंकलेखक | ३ | ० | ३ |
| २. | टंकलिपीक | ५१ | २१ | २५ |
| एकुण | | | | २८ |

Scanned with CamScanner

महामंडळामध्ये नियमित भरती होईपर्यंत पदे भरणेबाबत निविदा प्रक्रिया राबवुन किंवा शासन पॅनलवर असणाऱ्या बाहययंत्रणेकडून सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यतेस सदर विषय हा संचालक मंडळासमोर ठेवण्यात आला.

मा.संचालक मंडळाच्या चर्चेत शासनाच्या वन विकास महामंडळातील रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावुन घेतले आहे, त्यानुसार महामंडळातील रोंजदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत सुचविले. तसेच रोजंदारी कर्मचाऱ्यांचे वेतन हे नियमित करणेबाबत सर्व संचालकांनी सुचविले. सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ५ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, वन विकास महामंडळाकडील रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावुन घेतले आहे, त्यानुसार महामंडळातील रोंजदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवुन याबाबतची सविस्तर अहवाल हा पुढील सभेस ठेवण्यात यावा. बाहय यंत्रणेद्वारे भरण्यात येण्याऱ्या पदांवर लागणारा एकुण खर्चाचा तपशिल आगामी संचालक मंडळ सभेसमोर सादर करण्यात यावा.

**सुचक :** मा.श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक :** मा.श्री.मिनाक्षीताई वट्टी, संचालिक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ६ :- प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालयाचे इमारत भाडे अदागायीबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देणेबाबत.**

महामंडळाच्या अधिनस्त असलेल्या प्रादेशिक कार्यालसयांपैकी प्रादेशिक कार्यालय, जव्हार व यवतमाळ हे महामंडळाच्या मालकीचे जागेवर असुन उर्वरित प्रादेशिक कार्यालय व उपप्रादेशिक कार्यालय हे एक वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरानुसार इमारत भाडे तत्वावर घेतली जाते. सदर इमारत भाडे तत्वावर घेणे बाबतचे अधिकार महामंडळाचे उपविधीनुसार संचालक मंडळास प्रदान केलेले आहेत.

तरी याबाबत प्रादेशिक तथा उप-प्रादेशिक कार्यालय करिता इमारत भाडे तत्वावर घेणेकरिता मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देणेबाबत उचित निर्णयास्तव सविनय सादर.

याबाबत मा.संचालक सदस्यांनी असे नमुद केले की, ज्या वेळेस प्रादेशिक तथा उप-प्रादेशिक कार्यालय करिता इमारत भाडे अदायगीबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक यांचेवर अतिआवश्यक असल्यासच अधिकार वापरल्यास हरकत नाही.

सबब सांगोपांग चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ६ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, प्रादेशिक तथा उप-प्रादेशिक कार्यालय करिता इमारत भाडे तत्वावर घेणेवेळी अत्यावश्यक बाब असल्यावर मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देणेत येत आहेत.

**सुचक :** मा.श्री.धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ७** :- प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालयांमध्ये आदिवासी क्रांतीवीरांची रेखाचित्रे (फोटो) लावणेकरीता खरेदी करणेस येण्याऱ्या खर्चास प्रशासकीय /कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. शाआशा २०१७/प्र.क्र.४५६/का.१३. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२. दिनांक २८ डिसेंबर, २०१७ नुसार आदिवासी विभागातील कार्यालयामध्ये प्रमुख आदिवासी क्रांतीकारकांची रेखाचित्रे लावणेबाबत आदेशित केलेले आहे. त्याचप्रमाणे मा. मंत्री आदिवासी विकास तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१७ नुसार या कार्यालयास कळविलेले आहे.

त्यानुसार मुख्य कार्यालयामध्ये प्रमुख आदिवासी क्रांतीकारकांची रेखाचित्रे खरेदी करण्यात आलेली आहे त्यास मान्यता मिळावी. तसेच प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय स्तरावर सदर रेखाचित्रे खरेदी करणेसाठी अंदाजे अपेक्षित रक्कम रूपये ११.०० लक्ष मात्र खर्च लागण्याची शक्यता आहे. सदर खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यास मान्यता मिळावी. तरी सदर रेखाचित्रे खरेदी करणेकरीता मान्यतेस सदर विषय हा संचालक मंडळ सभेपुढे मांडण्यात आला. सदर विषयावर चर्चा होऊन सर्व संचालकांनी प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालयांमध्ये आदिवासी क्रांतीवीरांची रेखाचित्रे (फोटो) लावणेकरीता अनुमती दिली तसेच येण्याऱ्या खर्चास मान्यता दिली. चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ७ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालयांमध्ये आदिवासी क्रांतीवीरांची रेखाचित्रे (फोटो) लावणेकरीता संचालक मंडळ सभा मान्यता देत असुन सदर प्रक्रिया ही ई-निविदे द्वारे राबबुन येण्याऱ्या खरेदी करणेस येण्याऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**सुचक :** मा.श्री.धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य
**अनुमोदक :** मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य
**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

विषय क्रमांक ८ :- **विपणन विभागातील MFP For MSP साठी स्वतंत्र कक्ष, स्वतंत्र अभिलेख कक्ष व वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन/वार्ता) यांचेकरीता स्वतंत्र दालन करणे, कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्तीसाठी बाहय एजन्सी नियुक्त करणे यासाठी मान्यता मिळणेबाबत.**

सदरचा विषय सभेपुढे मांडतांना महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, केंद्र शासनाने MSP For MFP योजनेमध्ये गौणवनोपज वस्तुंचे हमीदर निश्चित केले असून त्यादराने महामंडळा मार्फत खरेदी करण्यात येते. यासाठी ट्रायफेड, नवी दिल्ली यांनी मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असुन त्यानुसार विपणन विभागात MSP For MFP साठी स्वतंत्र कक्ष निर्माण करणे विषय दिनांक १४.०९.२०१८ च्या सभेत मंजुर असुन त्यासाठी आवश्यक कर्मचारी तातपुरते नेमणेबाबत विषय ठेवण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे विपणन विभागाकरीता स्वतंत्र अभिलेख कक्ष व वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन/वार्ता) यांचे करीता स्वतंत्र दालन करणे, MSP For MFP योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्तीसाठी बाहय एजन्सी नियुक्ती करणे इत्यादी विषय मान्यतेसाठी ठेवणेत येत आहे.

यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक, ट्रायफेड नवी दिल्ली यांनी दिनांक ३.०८.२०१८ रोजी पनवेल, मुंबई येथे झालेल्या बैठकीत गौणवनोउपज योजनेसाठी विपणन विभागात स्वतंत्र कक्ष उघडण्यात यावा, याचे स्वरुप PMU (Project Management Unit) असावे. कारण शासनाला गौणवनोपज खरेदी करुन यात Value addition चे प्रस्ताव सादर करणे, ऑनलाईन विक्री, खरेदी वस्तुची ब्रॅन्डींग करणे, इत्यादी काम होणे आवश्यक असुन अशा कक्षाचे स्वरुप व्यावसायीक ज्ञान असलेले कर्मचारी असणे असे असावे. यासाठी बाहय एजन्सीद्वारे तातपुरते कर्मचारी नेमणे आवश्यक आहे. या पध्दतीने व्यावसायीक ज्ञान असलेल्या व्यक्तिचा स्वतंत्र कक्ष मुख्यालयात करणे, प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाला २ स्वतंत्र माहितगार कर्मचारी देणे याप्रकारे मुख्यालय व प्रादेशिक स्तरावर स्वतंत्र MFP कक्ष निर्माण होईल. मुख्यालयाला १ स्वतंत्र सल्लागार, २ संगणक ऑपरेटर व २ माहितगार स्टेनो/लिपीक असे ५ व्यक्तिंचा विपणन शाखेत स्वतंत्रकक्ष करणे आवश्यक आहे. याप्रकारे मुख्यालयासाठी १ स्वतंत्र सल्लागार साठी मागणी शासनाला करणे, मुख्यालयी ४ व प्रादेशिक कार्यालय २० कर्मचारी (अहेरी कार्यालय धरुन) असे एकूण २४ तज्ञ कर्मचारी बाहय एजन्सीद्वारे विहित कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करुन कर्मचारी तातपुरत्या नियुक्ती करणे इ. बाबी केल्यास सदर योजनेत महामंडळाच्या हिताच्या दृष्टीकोनातून नविन प्रयोग राबविले जाऊन सदर योजनेत प्रगती साधता येईल. आज या विषयासाठी व्यावसायीक ज्ञान असलेले व्यक्ति तर उपलब्ध नाहीच तसेच स्वतंत्र कर्मचारी देखिल नाही, म्हणून या विषयात हवी तशी प्रगती महामंडळाला करता येत नाही, ही वस्तुस्थिती विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. तसेच या पध्दतीने उपलब्ध तातपुरते कर्मचारी महामंडळाकडे अपुरा कर्मचारी वर्ग बघता इतर योजनेतही व कार्यालयीन इतर कामकाजात प्रादेशिक व्यवस्थापक यांना सहाय्यभुत ठरतील.

तसेच विपणन शाखेत वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन/वार्ता) यांचे करीता स्वतंत्र दालन करणे आवश्यक असुन आज त्यांच्यासाठी स्वतंत्र दालन नाही.

तसेच विपणन शाखा ही महामंडळाच्या कारभाराची कणा आहे. म्हणून या शाखेतील महत्वाची व नियमाप्रमाणे आवश्यक कागदपत्रे व नस्ती यांची स्कॅनिंग करुन या शाखेला स्वतंत्र अभिलेख कक्ष असणे आवश्यक आहे, जेणे करुन विषय निहाय, हंगाम निहाय, कर्मचारी निहाय, नस्ती क्रमांक निहाय वर्गीकरण करुन असे अभिलेख तयार व स्कॅनिंग करुन विपणन शाखेतच उपलब्ध जागेत Partition करुन सदर शाखेचा स्वतंत्र अभिलेखकक्ष निर्माण झाल्यास कार्यालयीन कामकाजाच्या सोईसाठी व न्यायालयीन /शासन पातळीवरुन मागणी झाल्यास त्वरीत कागदपत्रे उपलब्ध व्हावेत या हेतुने भविष्यात सदर विषय महामंडळाच्या हिताचा असेल. यावर मा. संचालक मा. श्री सुनिल भुसारा व मा.श्री देविदास पाटील यांनी सांगितले की, विपणन विभागातील MFP For MSP साठी स्वतंत्र कक्ष, स्वतंत्र अभिलेख कक्ष व वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन/वार्ता) यांचेकरीता स्वतंत्र दालन करणे, या करीता किती खर्च अपेक्षित खर्च आहे व सदर कामा करीता लागणारा पैसा कुठून येणार याचा सविस्तर अहवाल सभेस सादर करण्याच्या सुचना दिल्यात तसेच महाव्यवस्थापक (विपणन) यांनी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्तीसाठी बाहय मार्फत मुख्य कार्याल, नाशिक - ४ व प्रादेशिक कार्यालय - २० कर्मचारी ( अहेरी कार्यालय धरुन ) एकूण २४ तज्ञ कर्मचारी बाहय एजन्सीद्वारे विहित कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करुन कर्मचारी तातपुरत्या नियुक्ती करणे इ. बाबी केल्यास सदर योजनेत महामंडळाच्या हिताच्या दृष्टीकोनातून

Scanned with CamScanner

नविन प्रयोग राबविले जाऊन सदर योजनेत प्रगती साधता येईल. यावर मा. संचालक श्री काटे यांनी आक्षेप नोंदविला कि, सध्या महामंडळात रोजंदारी कर्मचारी कार्यरत असुन त्यांचेकडून सदर कामकाज करुन घेणे शक्य होईल का? तसेच महामंडळाचे सेवेत गेले अनेक वर्षापासून रोजंदारीवर तत्वावर कर्मचारी कार्यरत आहेत. पाहिले त्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेण्याची कार्यवाही करावी. यावर मा.मंत्री तथा अध्यक्ष यांनी विचाराणा केली असे किती कर्मचारी कार्यरत आहेत. उदा. ५ ते १०, १० ते १५ वर्ष अशी सेवा झाली आहे. प्रथम अशा कर्मचाऱ्यांची वर्गवारी करुनच पुढील योग्य ती कार्यवाही हाती घेण्यात येईल व पुढील योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे सभेस आदेशीत केले **व सदर विषय पुढील मिटींगमध्ये पुन्हा सादर करण्याच्या सुचना दिल्या.**

यावर वरीलप्रमाणे सांगोपांग चर्चा हाऊन खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ८ :-** विपणन विभागातील MFP For MSP साठी स्वतंत्र कक्ष, स्वतंत्र अभिलेख कक्ष व वरिष्ठ व्यवस्थापक (विपणन/वार्ता) यांचेकरीता स्वतंत्र दालन करणे, कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्तीसाठी बाहय एजन्सी नियुक्त करणे यासाठी मान्यता मिळणेबाबत हा विषय पुढील सभेत आकडेवारी व खर्चाचे अंदाजासह ठेवण्यांत यावा असा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक

**अनुमोदक** :- मा. श्री मधुकर निंबाजी काठे, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

क. सहाय्यक    उपव्यवस्थापक तथा प्र. व्यवस्थापक    व्यवस्थापक (विप-१)    वरिष्ठ व्यवस्थापक

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ९ :- एकाधिकार योजनेसाठी व महामंडळाच्या वाहनांच्या देयकासाठी हंगाम २०१८-१९ साठी वाहतुक दर निश्चित करणेबाबत.**

सदरचा विषय सभेपुढे मांडतांना महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केंद्र ते साठवणुक केंद्रापर्यंत वाहतुक करावी लागते सदरची वाहतुक महामंडळाचे वाहनाने केली जाते मात्र अपवादात्मक परिस्थितीत महामंडळाची वाहने उपलब्ध न झाल्यास खाजगी ठेकेदारांमार्फत वाहतुक केली जाते. यासाठी ई-निविदा मागवून वाहतुक दर निश्चित केले जातात. गत दोन हंगामामध्ये वाहतुक दर मागविण्यासाठी मुख्य कार्यालय स्तरावर तसेच प्रादेशिक कार्यालय स्तरावर ई-निविदा मागविल्या असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे २०१४-१५ मध्ये मंजुरी दिलेल्या वाहतुक दरास वेळोवेळी प्रादेशिक कार्यालयांना मुदतवाढ दिलेली आहे. सदर बाबीत भविष्यात लेखाआक्षेप निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच याबाबत एकवाक्यता व सुसुत्रता होण्यासाठी तसेच ई-निविदेचा दरवर्षी लागणारा कालावधी टळण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात संबधीत जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत मंजुर केलेले दर महामंडळाला लागु केल्यास ते प्रशासकीय सोयीचे व वेळेची बचत करणारे धोरण ठरेल.

जिल्हाधिकारी सदर प्रक्रिया ई-निविदेद्वारे राबवित असतात. ते शासनाचे जिल्हयाचे अधिकृत प्रतिनिधी असतात. तसेच अन्न व नागरी पुरवठा योजना त्यांच्या मार्फत राबविली जाते. तरी ज्या जिल्हयाचे दर जिल्हाधिकारी यांनी मंजुर केले असतील ते महामंडळासाठी त्या जिल्हयाकरीता व ज्या जिल्हयात दर मंजुर नसतील अशावेळी भौगोलिकदृष्टया जितके लगतचे जिल्हे असतील त्यातुन सर्वात कमी मंजुर दर महामंडळाच्या संबधीत जिल्हयासाठी लागु करण्याबाबत विषय मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे. यामुळे महामंडळाच्या वाहनांची देयके मंजुरीची प्रक्रिया सुटसुटीत व निःसंदिग्ध होईल.

याबाबत पूर्वीची वस्तुस्थिती अशी आहे की, --- प्रादेशिक कार्यालय, नाशिक व जव्हार यांना हंगाम २०१५-१६ साठी वाहतुक दरास मंजुरी दिली आहे. तेच वाहतुक दर इतर प्रादेशिक कार्यालयास दिनांक ०१.०४.२०१५ पासुन पुढील आदेशा पावेतो लागु करण्यास मंजुरी देण्यात आली होती. एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत खरेदी झालेला माल वाहतुक करण्यासाठी ई-निविदा मुख्य कार्यालय स्तरावर मागविण्यात आल्या होत्या. मात्र त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पुन्हा ई-निविदा मागविले असता त्यास लागणारा विलंब लक्षात घेता वेळेवर वाहतुक दर निश्चित व्हावेत तसेच त्या त्या विभागाच्या भौगोलीक परिस्थितीचा विचार करुन प्रादेशिक कार्यालय स्तरावर ई-निविदा काढुन वाहतुक ठेकेदार निश्चित करणे करीता मुख्य कार्यालय पत्र क्र.आविम/विप/प्रशा/वाहतुक दर/२०७५/१७ दिनांक ३०.०८.२०१७ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु प्रादेशिक कार्यालय स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविली असता त्यांना देखिल ई-निविदेस वाहतुक ठेकेदारांकडुन प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

यावर वरीलप्रमाणे सांगोपांग चर्चा हाऊन खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

<u>ठराव क्रमांक ९ :</u> - एकाधिकार योजनेसाठी व महामंडळाच्या वाहनांच्या देयकासाठी हंगाम २०१८-१९ साठी वाहतुक दर निश्चित ज्या जिल्हयाचे दर जिल्हाधिकारी यांनी मंजुर केले असतील ते महामंडळासाठी त्या जिल्हयाकरीता व ज्या जिल्हयात दर मंजुर नसतील अशावेळी भौगोलिकदृष्टया जितके लगतचे जिल्हे असतील त्यातुन सर्वात कमी मंजुर दर महामंडळाच्या संबधीत जिल्हयासाठी लागु करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचालक** :- मा.श्री धनराज हरिभाऊ महाले, संचालक

**अनुमोदक** :- मा.श्री देविदास पाटील, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १० :- गौणवनोपज, आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी झालेल्या मालाची, शेतकऱ्यांची ,आदिवासी संस्था, मिलर इत्यादीची माहिती ऑनलाईन सध्या NeML संस्थेमार्फत होत असून यासाठी चालु हंगामात यापोटीरु. ४२,८०,६३९/- रुपये महामंडळाने अदा केले असून याची कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत**

गौणवनोपज, आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी झालेल्या मालाची, शेतकऱ्यांची , आदिवासी संस्था, मिलर इत्यादीची माहिती ऑनलाईन सध्या NeML संस्थेमार्फत होत असून यासाठी चालु हंगामात यापोटी विसउस कार्यालयाच्या निर्देशाप्रमाणे रु. ४२,८०,६३९/- रुपये महामंडळाने अदा केले असून याची कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत विनंती आहे.

सदरचा विषय सभेपुढे मांडतांना महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, आधारभुत किंमत खरेदी योजनेत पारदर्शकता रहावी व शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे पेमेंट ७ दिवसाचे आत ऑनलाईद्वारा त्यांचे बँक खात्यात जमा व्हावी या दृष्टीने खरेदी झालेल्या मालाची, शेतकऱ्यांची, आदिवासी संस्था, राईस मिलर्स इत्यादीची माहिती ऑनलाईनद्वारा अद्यावत करण्यासाठी शासनाने नेमुण दिल्याप्रमाणे NeML या संस्थेमार्फत काम सुरु आहे. त्यामुळे हंगाम २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेत धान व भरडधान्याचे संपुर्ण पेमेंट ऑनलाईनद्वारा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत. यामुळे महामंडळाच्या खरेदी व पेमेंट कामात पारदर्शकता आली आहे.

या कामापोटी विसउस कार्यालयाच्या दिनांक ३१.०५.२०१८ च्या लेखी पत्र/निर्देशाप्रमाणे रु. ४२,८०,६३९/- रुपये महामंडळाने अदा केले आहे. यावर मा. संचालक श्री काठे यांनी विचारणा केली की, सदर पेमेंट करणेपूर्वी निधी मागणी प्रस्ताव शासनास सादर करावा व यापुढे संचालक मंडळाचे परवानगी शिवाय कोणतेही पेमेंट अदा करु नये, व अगोदर पेमेंट का केले अशी विचारणा केली असता, यावर मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, शासनाच्या निर्देशाप्रमाणेच रु. ४२,८०,६३९/- महामंडळाने NeML संस्थेला अदा केले आहे.

यावर वरील प्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १० :-** गौणवनोपज, आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी झालेल्या मालाची, शेतकऱ्यांची ,आदिवासी संस्था, मिलर इत्यादीची माहिती ऑनलाईन सध्या NeML संस्थेमार्फत होत असून यासाठी चालु हंगामात यापोटीरु. ४२,८०,६३९/- रुपये महामंडळाने अदा केले असून त्याला कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे, परंतु हा निधी शासनाकडून मागविण्यात यावा, महामंडळाने हा भार सोसू नये.

**सुचालक** :- मा.श्री धनराज हरिभाऊ महाले, संचालक

**अनुमोदक** :- मा.श्री देविदास पाटील, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

उपव्यवस्थापक | व्यवस्थापक (विपणन-१) | वरिष्ठ व्यवस्थापक

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ११ :- हंगाम २०१८-१९ मध्ये नविन बारदाना, ताडपत्री, इलेक्ट्रीक वजन काटे, आद्रतामापक यंत्र, इमेज ॲनालायझर व इतर साहित्य कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करुन खरेदीसाठी मान्यता मिळणेबाबत.**

पणन हंगाम दि. १.१०.२०१८ पासून सुरु होत आहे. खरेदीसाठी लागणारा बारदाना, ताडपत्री, इलेक्ट्रीक वजन काटे, आद्रतामापक यंत्र व इतर साहित्य हे हंगाम सुरु होण्यापूर्वीच खरेदी केंद्रांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदरचा विषय दिनांक १४.०९.२०१८ च्या संचालक मंडळाच्या सभेत मांडला असता आगामी हंगामासाठी ई-निविदा पध्दतीने एकदा वापरलेला बारदाना व जिल्हा पुरवठा अधिकारीकडे देण्यांत येणाऱ्या तांदुळासाठी आवश्यकतेनुसार नविन बारदाना खरेदी करण्याचा ठराव मंजुर झालेला असुन ई-निविदाद्वारे ताडपत्री, इलेक्ट्रीक वजन काटे,आद्रतामापक यंत्र, इमेज ॲनालायझर खरेदीसाठी विषय मान्यता मिळणेसाठी पुढील सभेत ठेवण्यात यावा असे मंजुर ठरावात निर्देश असल्याने याबाबत या सभेत मान्यतेसाठी विषय ठेवण्यात येत आहे.

दिनांक १४.०९.२०१८ च्या संचालक मंडळ सभेत एकदा वापरलेला बारदाना खरेदी विषय मंजुर झाल्याने जिल्हा पुरवठा अधिकारीकडे देण्यांत येणाऱ्या तांदुळासाठी आवश्यकतेनुसार नविन SBT बारदाना ५८० ग्रॅम वजनाचा ई-निविदेद्वारे खरेदी करण्यात येईल, ही बाबत निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तसेच मागील हंगामाप्रमाणे बारदाना अभावी खरेदीच्या तक्रारी उद्‌भवू नये यादृष्टीने शेतकऱ्यांनी धानासोबत दिलेला बारदाना प्रतिनग रु. १५/- प्रमाणे घ्यावा किंवा कसे ? याबाबतही निर्णय होणे आवश्यक आहे. सदर बाबीवर मागील सभेत चर्चा झाली नाही, म्हणून ही बाब निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

महामंडळाकडे स्वतःची पुरेशी गोदामे नसल्याने अंदाजे ६०% धान गडचिरोली व भंडारा परिसरात उघड्यावर साठविण्यात येतो, सबब आगामी हंगामात या धानाच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक कार्यालयाच्या मागणीप्रमाणे ई-निविदेद्वारे धान झाकुन ठेवण्यासाठी ताडपत्री खरेदी करणे आवश्यक आहे.

प्रलंबित CMR वसुली, खरेदी केंद्राची कामकाज पध्दती इ.बाबत हंगाम २००९-१० ते २०१३-१४ कालावधीतसाठी असलेल्या तृटींबाबत मा.लोकलेखा समिती, विधान भवन मुंबई येथे याबावतचे विषयाची साक्ष सुरु असुन दिनांक २१.०२.२०१८, ३१.०७.२०१८ च्या साक्ष वेळी महामंडळाने खरेदी प्रक्रीया पारदर्शक व्हावी म्हणून इलेक्ट्रॉनिक वजन काटे,आद्रतामापक यंत्र, इमेज ॲनालायझर खरेदी करण्याबावत लेखी आश्वासन दिलेले आहे. धान व इतर माल खरेदी करतांना अचुक मोजमाप होण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजनकाटे व आर्द्रता मोजण्यासाठी आर्द्रतामापक यंत्र व धानाच्या प्रतिबाबत तक्रारीचे निरसन होणेसाठी इमेज ॲनालायझर (प्रतिमा विश्लेषण यंत्र) नसल्याबाबत मा.महालेखाकार, मुंबई यांनी लेखापरिक्षणात ताशेरे ओढले असुन सदर बाब मा.लोकलेखा समितीत साक्ष मध्ये अंतर्भुत आहे. तसेच वेळोवेळी याबाबत शेतकऱ्यांची फसवणुक होत असल्याबाबत विधानसभा प्रश्न उपस्थित झालेले आहेत. विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३८२५८ मध्ये दिनांक ०५.०३.२०१८ रोजी महामंडळाने दिलेल्या लेखी उत्तरात कृषीउत्पन्न बाजार समितीकडुन इलेक्ट्रॉनिक वजनकाटे उपलब्ध न झाल्यास महामंडळ खरेदी करेल असे म्हटले आहे. प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती इलेक्ट्रॉनिक वजनकाटे पुरवित नाही असे लेखी कळविले आहे. तसेच त्यांच्याकडे किती इलेक्ट्रॉनिक वजनकाटे सुस्थितीत आहे व कितीची आवश्यकता आहे याबाबत यापूर्वीच माहिती घेवून त्यावेळेस संचालक मंडळ सभा नियोजित नसल्याने दि. २१.०७.२०१८ रोजी कार्यालयीन टिपणीद्वारा मा.अध्यक्ष तथा मंत्री महोदय यांची ४५९ इलेक्ट्रॉनिक वजन काटे, १८३ आर्द्रतामापक यंत्र, ०५ इमेज ॲनालायझर ई-निविदेद्वारे खरेदीसाठी मान्यता घेण्यात आली आहे. तरी सदर खरेदी व ताडपत्री खरेदीला मान्यता मिळण्यासाठी विषय ठेवण्यात येत आहे.

तसेच दिनांक १४.०९.२०१८ च्या संचालक मंडळ सभेत मा.श्री विकास वळवी, संचालक यांनी सीलच्या चाळण्या खरेदीबाबत सुचना केली. त्याप्रमाणे मागणी नोंदवून कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करणेस मान्येता मिळावी असे मत महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे मांडले तेव्हा यापूर्वी वरील प्रमाणे डेडस्टॉक खरेदीस मा.मंत्री तथा अध्यक्ष यांची मंजुरी मिळाली आहे असे त्यांनी सभेस सांगितले यावर मा. श्री दुधनाग, संचालक यांनी मत मांडले की, सदर साहित्य खरेदीची घाई करत आहात. यावर महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, इलेक्ट्रॉनिक वजन काटे,आद्रतामापक यंत्र, इमेज ॲनालायझर खरेदी करण्याबावत

Scanned with CamScanner

लेखी आश्वासन दिलेले आहे. धान व इतर माल खरेदी करतांना अचुक मोजमाप होण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजनकाटे व आर्द्रता मोजण्यासाठी आर्द्रतामापक यंत्र व धानाच्या प्रतिबाबत तक्रारीचे निरसन होणेसाठी इमेज ॲनालायझर (प्रतिमा विश्लेषण यंत्र) नसल्याबाबत मा.महालेखाकार, मुंबई यांनी लेखापरिक्षणात ताशेरे ओढले असुन सदर बाब मा.लोकलेखा समितीत साक्ष मध्ये अंतर्भुत आहे. तसेच वेळोवेळी याबाबत शेतकऱ्यांची फसवणुक होत असल्याबाबत विधानसभा प्रश्न उपस्थित झालेले आहेत. विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३८२५८ मध्ये दिनांक ०५.०३.२०१८ रोजी महामंडळाने दिलेल्या लेखी उत्तरात कृषीउत्पन्न बाजार समितीकडुन इलेक्ट्रॉनिक वजनकाटे उपलब्ध न झाल्यास महामंडळ खरेदी करेल असे म्हटले आहे. यावर मा. श्री देविदास पाटील व मा. श्री काठे यांनी मत मांडले की, सदर साहित्य खरेदी करणेची अत्यंत आवश्यकता आहे. त्यापूर्वी प्रादेशिक व्यवस्थापक यांची मागणी विचारात घेवूनच ती संचालक मंडळ बोर्डास अवगत करुनच खरेदीची कार्यवाही करावी. तसेच मा. संचालिका मा.श्रीमती मिनाक्षीताई वट्टी यानी सांगितले की, महामंडळाचे कामकाजाबाबत राज्यमंत्र्याना अवगत करावे व **विषय पुन्हा परिपूर्ण माहितीसह पुढील सभेत पुन्हा विषय सादर करावा असे सर्व मा.संचालकांनी सुचित केले.**

यावर वरील प्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ११ :-** हंगाम २०१८-१९ मध्ये नविन बारदाना, ताडपत्री व एकदा वापलेला बारदाना ई-निविदा पध्दतीने खरेदीसाठी मान्यता देण्यात येत आहे. इलेक्ट्रीक वजन काटे, आद्रतामापक यंत्र, इमेज ॲनालायझर व इतर साहित्य खरेदीसाठी खर्चाच्या अंदाजासह व परिपूर्ण माहितीसह विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा., असा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक :-** मा. श्री भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक
**अनुमोदक :-** मा.श्रीमती मिनाक्षीताई अर्जुनराव वट्टी, संचालिका

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

कृ. रेखापाल उपव्यवस्थापक व्यवस्थापक (वित्त) वरिष्ठ व्यवस्थापक महाव्यवस्थापक

Scanned with CamScanner

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक** :- **हंगाम २००९-१० ते २०१६-१७ मधील घट-तुट व खरेदी कमिशन अदायगी बाबत.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा वरील प्रमाणे विषय मा. संचालक श्री दुधनाग यांनी सभेपुढे मांडला. यावर त्यांनी मत मांडले की, हंगाम २०१९-१० ते २०१६-१७ कालावधीत ज्या संस्थांच्या घट-तुट २% आहेत त्यांना प्रलंबित संस्था कमिशन अदा करण्यात यावे. या संस्थासोबत प्रादेशिक व्यवस्थापक यांनी खरेदीसाठी करारनामा करतांना २% वाजवी घट बाबत करारनाम्यात नोंद केली आहे. तसेच संस्थांना कमिशन खरेदी दिनांका पूर्वी अदा न झाल्यास आगामी हंगाम २०१८-१९ च्या खरेदीसाठी संस्था बहिष्कार टाकण्याचे तयारीत आहेत. यावर मा.व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (विपणन) यांनी मत मांडले की, हंगाम २००९-१० ते २०१६-१७ काळातील अवाजवी घट-तुटची वसुलीचा विषय मा.लोकलेखा समितीच्या साक्ष मध्ये प्रलंबित असुन २% वाजवी घट ६ महिन्यापर्यंत भरडाई झाल्यास व भरडाई ६ महिन्यात न झाल्यास त्यापुढील प्रत्यक वर्षी २% अतिरिक्त घट-तुट मंजुरीचा प्रस्ताव दि. २४.०८.२०१८ रोजी शासनाला सादर केलेला आहे. तसेच या कालावधीतील नैसर्गिक तुट ( ऊनवारा, अतिवृष्टी, उंदीरघुस यामुळे नुकसान) निर्लेखनाचा प्रस्ताव शासनाला मंजुरीसाठी पाठवायाचा आहे. यासाठी पथके निर्माण करुन तपासणी झाली असुन प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रस्ताव मंजुरीनंतर होणाऱ्या आकडेमोडी नंतर सदर कमिशन अदा करणे योग्य राहिल. अन्यथा वसुलीचा प्रश्न निर्माण होईल. यावर सदर संस्था आगामी खरेदीवर बहिष्कार टाकतील ही अडचण लक्षात घेऊन ज्या संस्थेच्या घट २% आहेत त्यांना खरेदी कमिशन अदा करावे असे संचालक श्री काटे, श्री मंगाम व श्री दडमल यांनी सांगितले.

यावर वरीलप्रमाणे सांगोपांग चर्चा हाऊन खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्रमांक** :- ज्या संस्थाची घट-तुट २% आहे अशा संस्थाचे प्रलंबित खरेदी कमिशन अदा करण्यात यावे.

**सुचक** :- मा. श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
**अनुमोदक** :- मा. श्री प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

क. सहायक　उपव्यवस्थापक　व्यवस्थापक (विप-१)　वरिष्ठ व्यवस्थापक　महाव्यवस्थापक

Scanned with CamScanner

आयत्या वेळेचा विषय :- प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार व धारणी येथील हंगाम २०१४-१५ ते २०१५-१६ या कालावधीत विक्री अभावी शिल्लक तुर खराब होत असून सदर नुकसाणीस जबाबदार कोण, व विक्रीची कार्यवाही लवकरात लवकत होणे बाबत.

कार्यालयीन विषय संपल्यावर मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा वरील प्रमाणे मा. संचालक मा.श्री काठे व मा.श्री मंगाम यांनी हंगाम २०१४-१५ ते २०१५-१६ या तीन वर्षापासून अनुक्रमे प्रादेशिक कार्यालय नंदुरबार व धारणी येथे मोठया प्रमाणात विक्री अभावी तुर पडून असुन सदयास्थितीत सदर तुर खराब होत असून परिणामी महामंडळाचे नुकसान होत असून सदर नुकसानीस जबाबदार कोण? या बाबीकडे सर्वांचे लक्ष वेधण्यात आले. यावर मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी संबधीतास सदर तुर मागील ३ हंगामापासून विक्री अभावी शिल्लक राहण्याचे कारण काय ? यावर महाव्यवस्थापक (विपणन) व स्थानिक संचालक यांनी सांगितले की, ई-लिलावात बीईपी पेक्षा कमी दर प्राप्त होत असल्या कारणाने सदर तुर शिल्लक आहे. वेळोवेळी प्रादेशिक कार्यालय स्तरावर लिलाव आयोजित करुन देखिल बीईपी पेक्षा कमी दर प्राप्त होत आहेत. यात जबाबदारीचा विषय नसुन दराबाबत तांत्रिक अडचण येते असे उपस्थित अधिकाऱ्यांनी नमुद केले. पुढे महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सांगितले की, दिनांक १२.१०.२०१७ च्या संचालक मंडळ सभेत विषय क्रमांक १३ (ब) मंजुर असुन यात प्रादेशिक स्तरावर स्थानिक समितीने निर्णय घ्यावा, परंतु यात महामंडळाचे नुकसान होणार नाही असे पणनमुद आहे. तुर खरेदी वेळीचा खरेदी दरात अनुषंगिक खर्चाची भर पडून BEP दर काढला जातो. ई-लिलावात प्राप्त दर BEP दरापेक्षा कमी असल्याने मंजुरीला अडचण होते. तसेच मागिल सभेत मंजुर ठरावात संचालकांनी समिती नेमण्याचे ठरले आहे, परंतु या समितीनेही ई-लिलात BEP दरापेक्षा कमी दराने मंजुर केल्यास अडचण होईल. यावर मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी भविष्यात संचालक मंडळासह सर्वांवर वसुली होईल, असे मत मांडले. तसेच व्यवस्थापक (लेखा) यांनी सभेत माहिती दिली की, एकाधिकार खरेदी योजनेत झालेला तोटा सहन करण्याची जबाबदारी शासनाची असुन तसा शासन निर्णय आहे. यावर मा. व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (विपणन) यांनी संचालक समितीने ई-लिलाव करुन तोटा नमुद करुन प्रस्ताव वस्तुस्थिती नमुद करुन पाठवावा व तो शासनाला मंजुरीला पाठविणे योग्य राहिल असे मत मांडले.

यावर सर्वानुमते चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव मंजुर झाला.

आयत्या वेळेचा ठराव क्रमांक :- दि. १४.०९.२०१८ सभेत मंजुर ठरावाप्रमाणे संचालक समितीने ई-लिलाव घेवून त्यात BEP दर, येणारा तोटा व वस्तुस्थिती नमुद करुन प्रादेशिक व्यवस्थापक यांनी प्रस्ताव दयावा, सदर प्रस्ताव कारणमिमांसेह मंजुरीसाठी शासनाला सादर करण्यात येईल.

**सुचक** :- मा. श्रीमती मिनाक्षीताई अर्जुनराव वट्टी, मा.संचालक.

**अनुमोदक** :- मा. श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

क. सहाय्यक उपव्यवस्थापक व्यवस्थापक (विप-1) वरिष्ठ व्यवस्थापक महाव्यवस्थापक

Scanned with CamScanner

आयत्या वेळ...
विषय क्र :०१ सन २०१८-१९ वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व लेखापरिक्षक शुल्क निश्चिती बाबत.

सहकार कायदा १९६० च्या ९७ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड एम व महाराष्ट्र शासन अध्यादेश दि.१४.०२.२०१३ ला अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणा शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/३८९/प्र.क्र.५५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई दि.०४.०३.२०१३ अनुसार तसेच सहकार कायदा १९६० चे कलम ७५ (२अ) नुसार "प्रत्येक संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम ८१ मध्ये निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरिक्षकाची किंवा लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थेची चालु वित्तीय वर्षासाठी नेमणुक करायची आहे.

दि.१४/०९/२०१८ रोजी नागपुर येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्र.३२.

"सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, महामंडळाचे सन २०१८-१९ करीता लेखापरीक्षक नेमण्यासाठी सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था हे जर सहकार विभागाच्या नाम तालिकेत असतिल तर त्यांना महामंडळाचे लेखापरीक्षण करण्या बाबत लेखी पत्राव्दारे विचारना करण्यात यावी. यानंतर पुढील सभेत सदरचा विषय सादर करावा.

सुचक :- मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम.

अनुमोदक :- मा.श्री.मधुकर निंबाजी काटे.

ठराव सर्वानुमते मंजूर."

सदर ठरावा नुसार, सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांना मुख्य कार्यालय, नाशिक च्या जा.क्र.आविम/लेखापारीक्षण/२०१८-१९/४०९०/२०१८ नाशिक दि.२४/०९/२०१८ पत्र ई-मेल व्दारे देण्यात आले. आज दि.२७/०९/२०१८ अखेर पर्यंत सहकार विभागातील विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले नाही.

दि.३०/०९/२०१८ अखेर पर्यंत सदर संवैधनिक लेखापरीक्षकाची नेमणूक होणे सहकार कायदयाने आवश्यक आहे. करीता सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ व क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ मधील अ.क्र. १० मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक चे शुल्क खालील प्रमाणे नमुद आहे.

| Sr. No. | Type of Society | As per new notification | | |
|---|---|---|---|---|
| | | Scale of Fees | | |
| | | Details of Parameters | Amount as per Parameters | Maximum amount limit |
| 10 | Maharashtra State co-operative Tribal Development Corporation Ltd. | Procurement & Processing of per quintle | | 2500000 |
| a | For Government Procurement | | 0.50 | |
| b | For Service Supply | Per unit | 10000 | |
| c | In liquidation | | | 20000 |

उपरोक्त शासन निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांचे दि.०२/०५/२०१६ च्या निकाला नुसार स्थगिती (Stayed) आहे.

महामंडळाचे सन २०१८-१९ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१०/०९/२०१८ पर्यंत खालील प्रमाणे सनदी लेखापाल व सनदी लेखापाल संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.



Scanned with CamScanner

| अ. क्र. | सहकार पॅनल क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | सहकार पॅनल वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १०१४३१२ | बी. आय. डी. एस. अॅण्ड कंपनी, औरंगाबाद. | अ-१ |
| २ | १७८२७ | ए. एस. के. वाय. अॅण्ड कंपनी, पुणे. | अ-१ |
| ३ | १४३५३ | वामु अॅण्ड असोसिएट, पुणे | अ-१ |
| ४ | १८०८९५ | एन. एस. एम. अॅण्ड कंपनी., नाशिक | ब-१ |
| ५ | - | मुळे येवलेकर अॅण्ड असोसिएट, मुंबई. | (सहकार पॅनलवर नोंद नाही.) |

उपरोक्त तपशिला प्रमाणे सदर संस्था हया सन २०१८-१९ संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता इच्छुक आहे याबाबत तपशिल खालिल प्रमाणे.

१ अनुक्रमांक ३ मधील सहकार पॅनल क्र.१४३५३ वामु अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांनी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ चे नेमणुक करणे करण्यात आलेली आहे. "दि.२९/१०/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र.२(२) एक लेखापरीक्षक एकाच संस्थेचे सलग तीन वर्षापेक्षा जास्त मुदती साठी लेखापरीक्षण करु शकत नाही." त्यामुळेवामु अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, पुणे यांची नेमणुक करता येणार नाही.

२ अ.क्र.४ सहकार पॅनल क्र.१८०८९५ एन.एस.एम. अॅण्ड कंपनी., सनदी लेखापाल, नाशिक यां सहकार पॅनल मधिल वर्गवारी ब-१ मध्ये येते. त्यामुळे एन.एस.एम. अॅण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची नेमणुक करता येणार नाही.

३ अक्र.५ मुळे येवलेकर अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, मुंबई हे सहकार पॅनल वर नाहीत. त्यामुळे मुळे येवलेकर अॅण्ड असोसिएट, सनदी लेखापाल, मुंबई यांची नेमणुक करता येणार नाही.

४ अक्र.१ सहकार पॅनल क्र. १०१४३१२ बी. आय. डी. एस. अॅण्ड कंपनी, सनदी लेखापाल, औरंगाबाद सहकार पॅनल वर्ग अ-१ व

अक्र.२ सहकार पॅनल क्र.१७८२७ ए.एस.के.वाय. अॅण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे. सहकार पॅनल वर्ग अ-१ समावेश आहे.

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र.३ व ४ नुसार यांचे बी. आय. डी. एस. अॅण्ड कंपनी, सनदं लेखापाल, औरंगाबाद व ए.एस.के.वाय. अॅण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे अर्जानुसार ———— सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

आयत्या वेळचा ठराव क्र.०१:- सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी ए. एस. के. वाय. अॅण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नियमा नुसार लेखापरीक्षण फी निश्चित करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग.
अनुमोदक :- मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले.
ठराव सर्वानुमते मंजूर.

Scanned with CamScanner

उपरोक्त प्रमाणे सभेमध्ये विषयावर चर्चा झाल्यावर महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी आभार प्रदर्शन करतांना सांगितले की, आजच्या संचालक मंडळाच्या सभेसाठी वेळात वेळ काढुन सभेस हजर राहिल्याबद्दल मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, सन्माननीय संचालक यांचे मन:पुर्वक हार्दीक आभार मानुन, मा.अध्यक्ष महोदय यांचेवतीने कामकाज संपल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक (प्रशासन), महाव्यवस्थापक (वित्त) महाव्यवस्थापक (विपणन)

व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक

मा. अध्यक्ष

Scanned with CamScanner